महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार





छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१८ वे | दिनांक : ०३/०८/२०२६ | वार : सोमवार

## 'राजकारणातून रिटायर्ड व्हावंसं वाटतंय'; पंकजा मुंडेंच्या वक्तव्याची चर्चा




**बीड :** भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी 'मला राजकारणातून रिटायर्ड व्हावंसं वाटतंय', असे मोठे विधान केल्याने सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. मात्र, राजकारणातून निवृत्त व्हावेसे वाटत असले तरी जनतेचा प्रचंड उत्साह पाहून आपल्याला काम करण्यासाठी नव्याने उभारी मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, या संवादादरम्यान त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचे विशेष कौतुक करताना, 'पंतप्रधान मोदी हे खऱ्या अर्थाने देशाच्या विकासाचे आणि उज्ज्वल भविष्याचे 'फ्रेंड' आहेत', अशा शब्दांत त्यांच्या नेतृत्वाची स्तुती केली आहे. परळी महामार्गाच्या दुरावस्थेवर भाष्य करताना पंकजा मुंडे यांनी भावनिक वक्तव्य केले आहे. त्या म्हणाल्या, या रस्त्यावर खडकत-खडकत आले आणि पीएला म्हणाले, आता कंटाळा आला आहे. राजकारणातून रिटायर्ड व्हावे वाटत आहे. मात्र सभेच्या ठिकाणी आल्यानंतर नागरिकांचा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून आपल्याला नव्याने प्रेरणा मिळाल्याचे मुंडे यांनी म्हटले. ही लाल दिव्याची गाडी माझ्यासाठी नाही, तर तुमचा विकास करण्यासाठी आहे, असेही पंकजा यांनी यावेळी म्हटले. पंकजा मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीबाबत सांगितलेला एक अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी अनुभव सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीतील हा खास प्रसंग त्यांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून उलगडून सांगितला. पंकजा मुंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या महत्त्वाच्या बैठकीसाठी त्या स्वतः दोन ते तीन दिवस दिल्लीत उपस्थित होत्या. या बैठकीच्या अगदी शेवटच्या दिवशी, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपला अमेरिकेचा प्रदीर्घ आणि अधिकृत दौरा पूर्ण करून थेट या बैठकीच्या ठिकाणी पोहोचले होते. प्रवासाचा कोणताही थकवा चेहऱ्यावर न जाणवू देता, पंतप्रधानांनी प्रत्येक मतदारसंघाचा अत्यंत सविस्तर आढावा घेतला आणि स्थानिक प्रश्न, संघटनात्मक बाबी तसेच विकासकामांवर सखोल चर्चा केली. विशेष बाब म्हणजे, ही महत्त्वपूर्ण बैठक सलग साडेआठ तास चालली आणि या प्रदीर्घ वेळात केवळ दोन वेळा चहा तर एकदा कॉफीसाठी अल्प विश्रांती घेण्यात आली. या संपूर्ण वेळेत पंतप्रधान प्रत्येक विषयात बारकाईने लक्ष घालून चर्चा करत असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. या अनुभवातून पंतप्रधानांची राष्ट्राप्रती असलेली अतूट भावनिक बांधिलकी अधोरेखित करताना त्या शेवटी म्हणाल्या की, "ज्यांना स्वतःचा परिवार नाही, त्यांनी या संपूर्ण देशालाच आपला परिवार मानले आहे."

## पीक विमा योजनेला १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ



**मुंबई :** राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'ला मुदतवाढ दिली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज करण्याची मूळ अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ होती, मात्र तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकरी अर्ज करण्यापासून वंचित राहिल्याने आता ही मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही माहिती दिली असून, 'अल निनो'चे संभाव्य संकट आणि त्यामुळे निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेत पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी पीक कर्जदार शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित बँकेशी संपर्क साधावा, तर कर्ज न घेतलेल्या बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी 'pmfby.gov.in' या अधिकृत वेबसाईटवर जाऊन किंवा जवळच्या सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज भरावा. यासोबतच 'PMFBY Crop Insurance' या मोबाईल ॲपद्वारेही थेट ऑनलाईन अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी १० ऑगस्टपर्यंत आपली अर्ज प्रक्रिया पूर्ण करून या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. राज्यात आतापर्यंत तब्बल ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'अंतर्गत अधिकृत नोंदणी केली आहे. मात्र, वेबसाईट संथ चालणे, इंटरनेटचा वेग कमी असणे आणि इतर अनेक तांत्रिक अडचणींमुळे अद्यापही काही शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले. या परिस्थितीची दखल घेत राज्य सरकारने पीक विमा योजनेच्या नोंदणीसाठी आणखी आठ दिवसांची मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे उर्वरित शेतकऱ्यांना आपला अर्ज भरण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे. या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला असून, उपलब्ध आकडेवारीनुसार छत्रपती संभाजीनगर विभागातून सर्वाधिक १३ लाख २५ हजार शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी नोंदणी केली आहे. त्यापाठोपाठ अमरावती (६,९१,९७३), पुणे (६,०७,६६३) आणि नागपूर (४,५३,३८३) या विभागांचा क्रमांक लागतो.

## एफडीए वादावर तुकाराम मुंढेंचे स्पष्टीकरण



**मुंबई :** अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागातील धडक कारवायांमुळे चर्चेत असलेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी प्रथमच विभागातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारींवर सविस्तर भूमिका स्पष्ट केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेतील काही कर्मचाऱ्यांनी कामाचे तास, सुट्ट्या आणि कार्यालयीन वेळेबाबत मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र, प्रयोगशाळेचे काम आणि सामान्य कार्यालयीन कामकाज यात मूलभूत फरक असून, लॅब 24 तास कार्यरत ठेवण्यासाठी शिफ्ट पद्धती अपरिहार्य असल्याचे तुकाराम मुंढे यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळेतील तब्बल २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीविरोधात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. वाढीव कामाचा ताण, दोन शिफ्टची कार्यपद्धती आणि सुट्टीच्या दिवशीही काम करण्याचे आदेश यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचा दावा या कर्मचाऱ्यांनी केला होता. यावर तुकाराम मुंढे यांनी 'एबीपी माझा'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत पहिल्यांदाच मौन सोडले असून सविस्तर खुलासा केला आहे. कर्मचाऱ्यांच्या तक्रारीबाबत स्पष्टीकरण देताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "छत्रपती संभाजीनगर येथील एफडीए प्रयोगशाळेतील (Lab) काही कर्मचाऱ्यांनी ही तक्रार केली होती. त्यांची प्रमुख मागणी होती की, त्यांना इतर सर्वसाधारण कार्यालयांप्रमाणेच 10 ते 6 अशी वेळ द्यावी. मात्र, प्रयोगशाळा ही कार्यालयाप्रमाणे चालू शकत नाही. प्रयोगशाळा आणि ऑफिस यामधील फरक जर या कर्मचाऱ्यांना अजूनही समजला नसेल, तर ती आमचीच चूक म्हणावी लागेल." "माझ्याआधी या लॅब केवळ 10 ते 6 या वेळेतच चालत होत्या. त्यामुळे अन्न तपासणीचे रिपोर्ट वेळेवर येत नसल्याच्या अनेक तक्रारी होत्या. त्यामुळे आम्ही मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील लॅबमध्ये सकाळी 7 ते 1 आणि दुपारी 1 ते रात्री 9 अशा दोन शिफ्टमध्ये काम सुरू केले. मुंबई आणि नागपूरमधील कर्मचाऱ्यांना कोणतीही अडचण नाही, काम सुरळीत सुरू आहे; फक्त संभाजीनगरच्या कर्मचाऱ्यांनीच यावर तक्रार केली आहे," असे मुंढेंनी स्पष्ट केले. "नियमानुसार कोणत्याही कर्मचाऱ्याकडून 8 तासांपेक्षा किंवा आठवड्याला 48 तासांपेक्षा जास्त काम करून घेतले जात नाही, त्यांना एक मिनिटही जादा काम दिलेले नाही," असेही मुंढेंनी स्पष्ट केले. अनेक ठिकाणी सुधारणेची संधी न देता हॉटेल किंवा रेस्टॉरंटचे थेट परवाने का निलंबित केले जातात, या प्रश्नावरही तुकाराम मुंढेंनी वस्तुस्थिती समोर ठेवली. "दोन महिन्यांत एफडीएने राज्यभरात तब्बल 1400 ठिकाणी तपासण्या केल्या. यापैकी केवळ 110 ठिकाणचे (10 टक्क्यांहून कमी) परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर 300 पेक्षा जास्त ठिकाणी फक्त 'सुधारणा नोटीस' देण्यात आली आहे. कारवाईनंतर फक्त परवाना निलंबनाचीच चर्चा होते, नोटीस दिल्याची नाही," याकडे तुकाराम मुंढेंनी लक्ष वेधले. वर्ध्यातील प्रसिद्ध 'गोरस भंडार'ला नोटीस न देता थेट बंद करण्याचे आदेश एफडीएने दिले होते, ज्यावर उच्च न्यायालयानेही आक्षेप घेतला होता. यावर बोलताना तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, "कायद्याच्या दृष्टीने 'गोरस भंडार' ही केवळ एक 'फूड बिझनेस ऑपरेटर' संस्था आहे, कोणतीही 'आयकॉनिक' वास्तू नाही."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ ऑगस्ट २०२६

## रसुलपुरा धबधबा पर्यटकांना करत आहे आर्कर्षित



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** अगदी जवळ जटवाडा काठशीवरी रस्त्यावर खुलताबाद तालुक्यातील रसुलपुरा गावाजवळ १५० फूट धबधबा निसर्गरम्य वातावरणात कोसळणारा जलप्रवाह खडकावरून हिरव्यागार परिसरातील नयनरम्य जणू काही लोणावळा खंडाळा ची सहलीवर आपण भ्रमण करत असल्याचे भास करणारे वातावरण पर्यटकांना आर्कर्षित करत आहेहजारो च्या संख्येने पर्यटक या ठिकाणी पर्यटना चा आनंद घेत आहेछत्रपती संभाजीनगर ,दौलताबाद, खुलताबाद, वेरूळ, म्हैसमाळ, सुलीभजन पर्वत अश्या ठिकाणी जाताना लोक रसुलपुरा कडे आता जात आहेत आलेल्या पर्यटका मुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाले आहे हॉटेल,पान टपरी,शेंगा, मकाची कनिसे ,फळं विक्रेते अशी अनेक व्यवसायातुन महिला सह अनेकांना रोजगार उपलब्ध झाले आहेस्वछ वातावरण ताजी हवा आरोग्यासाठी खुप छान आहे भ्रमण करून रोगराई थांबवता येते सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पर्यटकांची पाऊले रसुलपुरा कडे वळली आहे दररोज हजारो पर्यटक आपल्या कटुंब सह मित्र मैत्रिणी यात महिला सुद्धा मोठ्या प्रमाणावर येथे दिसत आहे

## जिंतूरमध्ये ग्राहक पंचायतीच्या ऑनलाइन सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने दि. 1 ऑगस्ट 2026 पासून राज्यभर सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन सदस्य नोंदणी अभियानाला जिंतूर तालुक्यात पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुकास्तरीय बैठकीत पदाधिकाऱ्यांनी स्वतःची ऑनलाइन सदस्य नोंदणी करून अभियानाचा धडाक्यात शुभारंभ केला. देवगिरी प्रांतात सर्वाधिक सदस्य नोंदणी करण्याचा संकल्प करून प्रांत, जिल्हा, महानगर व तालुका स्तरावर प्रभावी नियोजन करण्याचे आवाहन देवगिरी प्रांताध्यक्ष डॉ. विलास मोरे यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शनिवारी (दि. 1) सकाळी 11 वाजता जिंतूर येथे तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले.बैठकीत तालुकाध्यक्ष मंचक देशमुख, शहराध्यक्ष दिलीप देवकर, मार्गदर्शक चंद्रकांत गवळी, उपाध्यक्ष संदीप माहूरकर, ॲड. रमेश वाकळे, प्रल्हाद टाकरस तसेच महिला पदाधिकाऱ्यांनी ऑनलाइन सदस्य नोंदणी करून अभियानाला प्रारंभ केला. पुढील एका महिन्यात तालुक्यातील प्रत्येक गावात सदस्य नोंदणी मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे होते. मार्गदर्शक चंद्रकांत गवळी, महिला अध्यक्ष आशाताई खिल्लारे व तालुकाध्यक्ष मंचक देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष दिलीप देवकर यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष संदीप माहूरकर यांनी मानले.चौकट'गाव तिथे ग्राहक पंचायत, घराघरात ग्राहक जागृती'"अधिकाधिक नागरिकांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे सदस्य होऊन ग्राहक हक्क व कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून जिंतूर तालुक्याला देवगिरी प्रांतात प्रथम क्रमांकावर आणण्याचा आपण सर्वांनी संकल्प करूया."— मंचक देशमुख, तालुकाध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिंतूर

## माळीवाडा येथे लोकशाहीर डाँ.आण्णा भाऊ साठे यांची १०६ वी जयंती



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी झेडा वंदन ग्रामविकास अधिकारी बालकृष्ण गव्हाने यांच्या हास्ते करण्यात आले तसेच आण्णा भाऊ साठे पुतळ्यास प्रशासक सरपंच ज्योती मुळे,उपसरपंच मनेश गाजरे, मान्यवराच्या हस्ते हार घालुन पुजन करण्यात आले. यावेळी पहिलीच्या शालेय विद्यार्थ्यांची आण्णाभाऊ साठे यांच्या जिवनावर भाषने केली.यावेळी सरपंच ज्योती मुळे उपसरपंच मनेश गाजरे, ग्रा.प.सदस्य कडू किर्तीकर, कृष्णा मुळे, धम्मापाल गायकवाड, कमलबाई अस्वार, , डॉ. शिवाजी गायकवाड, शिक्षका ज्योती घोरपडे,ग्रामविकास अधिकारी बालकृष्ण गव्हाने पोलिस पाटील प्रमोद साठे,नंदकिशोर मुळे,एकनाथ सिरसाठ, भानुदास आस्वार, जिल्हा परिषद शाळेचे मुख्यधापक फिरोज तडवी, बने भाई,सुधाकर हेकडे,गणेश अस्वार, शिवाजी अस्वार, सचिन जाधव,ताराबाई तुपे, भागुबाई अस्वार, दगडाबाई आस्वार, असाराम अस्वार आदि उपस्थित होते

## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश




**दौलताबाद (जावेद अहेमद) :** स्वामी विवेकानंद ग्लो स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज, आसेगाव येथील विद्यार्थ्यांनी शालेय व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत आरोही थोरात हिने 44.96 टक्के, प्रणित भगत याने 48.32 टक्के, तर तनुजा बनकर हिने 41.61 टक्के गुण मिळवून यश संपादन केले.तसेच इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तन्वी चव्हाण हिने 61.07 टक्के, आस्तिक उबाळे याने 58.38 टक्के, आचल गवळी हिने 57.61 टक्के, शर्वरी पपैया हिने 52.34 टक्के, भक्ती नवले हिने 46.97 टक्के, आरोही जाधव हिने 46.97 टक्के, दिव्या सुरासे हिने 43.62 टक्के आणि विराज काटकर याने 43.62 टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.या यशाबद्दल संस्थेच्या संचालिका गीता फाळके, सचिव रत्नाकर फाळके , अध्यक्ष बाबासाहेब सोनटक्के , प्राचार्य योगेश फाळके , मुख्याध्यापिका रोशनी कांबळे , शिक्षकवृंद तसेच पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ ऑगस्ट २०२६


## प्राचार्य डॉ आबासाहेब देशमुख यांना राजर्षी शाहू महाराज नॅशनल अवार्ड २०२६ प्रदान




**अकलूज :** शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल केज तालुक्यातील वरपगावचे सुपुत्र व महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष आणि शंकरराव मोहिते महाविद्यालय ,अकलूज चे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांना भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) त्यांनी राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय पुरस्कार 2026 नुकताच पुणे येथे महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च शिक्षण संचालक व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.ग्रामीण भागातील बहुजन समाजातील सर्वसामान्य गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ४५ वर्षापेक्षा अधिक काळ विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन व प्रेरणा देण्याचे काम केल्याबद्दल तसेच त्यांना वेळोवेळी आवश्यक ती सर्व मदत करून सामाजिक समानता व न्याय राष्ट्र बांधणीत भरीव योगदान दिल्याबद्दल हा बहुमान त्यांना देण्यात आला आहे. यापूर्वीही त्यांनी 1980 पासून ग्रामीण भागात ग्राम स्वच्छता , साक्षरता अभियान, व्यसनमुक्ती, रक्तदान, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, मतदार नोंदणी, महिला सक्षमीकरणइत्यादी क्षेत्रात भरीव काम केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने तीन वेळा राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. तसेच महिला सक्षमीकरण व महिला सुरक्षा यासाठी महाविद्यालय स्तरावर त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने शंकरराव मोहिते महाविद्यालय जिल्हास्तरीय एक लाख व विद्यापीठ स्तरीय दोन लाख रुपये तसेच गौरव चिन्ह देऊन त्यांच्या कार्याचे दखल घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या औरंगाबाद जिल्हा आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समितीवर सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी तसेच पैठण तालुका साक्षरता अभियान समितीचा वातावरण निर्मिती प्रमुख म्हणून ही त्यांनी भरीव काम केलेले आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने २००७ मध्ये त्यांना राज्य शिक्षक पुरस्कार देऊन तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने २०१६ मध्ये उत्कृष्ट प्राचार्य म्हणून त्यांचा गौरव केला आहे. तसेच मनशक्ती केंद्र , लोणावळा, रोटरी क्लब अकलूज यासारख्या अनेक संस्थांनी वेळोवेळी त्यांना पुरस्कृत करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन, दिल्ली यांनीही आंतरराष्ट्रीय उत्कृष्ट प्राचार्य म्हणून रोख रुपये २५००० व गौरव चिन्ह देऊन पुरस्कार देऊन त्यांचा दिल्ली येथे सन्मान केलेला आहे.सदर पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मानवी जीवन एक अमुल्य ठेवा

नेमकं जगावं कसं ? तर बसच्या एखाद्या कंडक्टर सारखं...!तासन् तास उभं राहायची लाज नाही आणि बसायला सीट मिळाली तरी माज नाही....!आख्खी बॅग पैशाने भरलेली असते; परंतु त्यातले चार आणे सुद्धा आपले नाहीत... आपण फक्त बॅग सांभाळणारे आहोत याची सतत जाणीव ठेवायची...!चिल्लर साठी एखाद्या वेळी एखाद्याशी वाद होणारच.... परंतु तो विसरून काही घडलंच नाही असं समजून दुसऱ्याशी बोलत राहायचं....,!"पुढे चला... पुढे सरका...." असं दुसऱ्याला मनापासून म्हणणारा जगातला हा एकमेव माणूस....खचाखच भरलेल्या बसमधील प्रत्येकाशी यांचं एकदा तरी संभाषण होतंच...पण कुणावर विशेष लोभ नाही...कोणावर राग तर मुळीच नाही... कुणाचा द्वेष नाही...कुणाचा तिरस्कार नाही...आपला संबंध फक्त तिकिटापुरता... !कुणी मध्येच उतरला तर त्याचे दु:ख नाही...कुणी मध्येच बस मध्ये आला तर त्याचं कौतुक नाही... दोघांसाठी हात पुढे करून दार उघडायचं... येईल तो येऊ दे.... जाईल तो जाऊ दे...मूळ ठिकाणी पोचायच्या आधी बस दहा बारा स्टेशनवर थांबते.... प्रत्येक गावात थोडावेळ उतरायचं ....आळोखे पिळोखे देत, आपलंच गाव आहे असं समजून थोडावेळ रेंगाळायचं....पण त्या गावात अडकायचं नाही....आपण इथले नव्हेत हे स्वत:शी बजावत, पुन्हा डबल बेल मारत पुढच्या "ठेसनावर" जायचं...."शिंगल" बेल मारली की थांबायचं... "डबल" मारली की निघायचं.... बास, इतके साधे नियम पाळायचे....आयुष्य जास्त किचकट करायचंच नाही...!हा शेवटचा स्टॉप आहे....समद्यांनी उतरून घ्या... असं सर्वांना बजावत स्वत:ची वळकटी उचलायची आणि प्रवास संपला की "आपल्या घरी" निघून जायचं.... !उद्या कुठे जायचं ? कधी निघायचं ? कुठल्या गाडीतनं जायचं ? ड्रायव्हर कोण असेल.... ? हे ठरवणारा वेगळा असतो...उद्या गाडी कुठली असेल याची खात्री नाही... ड्रायव्हर कोण असेल याचीही खात्री नाही.... सोबत प्रवासी कोण असतील याची शाश्वती नाही...शाश्वत एकच आहे... तो म्हणजे प्रवास...!आपण असू तरी, आणि आपण नसू तरीही... प्रवास कोणाचा ना कोणाचा तरी सुरू राहणारच आहे.... निरंतर आणि निरंतर...!आपल्या असण्यावाचून आणि नसण्यावाचून कोणालाही काहीही फरक पडणार नाही... प्रवास सुरू राहणारच आहे.... निरंतर आणि निरंतर...!आनंदी रहा, समाधानी रहा.



-प्रा डॉ राजेंद्र सोनवणे. जालना.

## लेखन प्रेरणा दिन आणि लेखक आपल्या भेटीला विशेष कार्यक्रम



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात त मराठी विभाग आयोजित लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त "लेखन प्रेरणा दिन " विशेष कार्यक्रमात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात समावेशित असलेले साहित्यिक कवी लेखक यांचा प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद व लेखन प्रेरणा असा कार्यक्रम अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात प्रसिद्ध लेखक, कवी ,साहित्यिक प्रा. विजय कुमार गवई आणि प्रसिद्ध कवी देवानंद पवार यांच्या 'अभ्यासक्रमातील कविता आणि अण्णाभाऊ साठे यांची कविता ' असा समयोचित कार्यक्रम दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे ,तरी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. नवनाथ गोरे व उपप्राचार्य प्रा. एन. एम. करडे यांनी केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ ऑगस्ट २०२६

## आपल्या मुलांचे बालपण जपा... कारण ते पुन्हा कधीच परत येणार नाही

माणसाच्या आयुष्यात अनेक टप्पे येतात. बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व—प्रत्येक टप्पा आपापल्या अनुभवांनी समृद्ध असतो. पण या सर्व टप्प्यांमध्ये सर्वात सुंदर, निरागस आणि आनंदाने नटलेला टप्पा म्हणजे बालपण.बालपण म्हणजे निरागस हसू. कारण नसताना खळखळून हसणे. छोट्याशा फुलात विश्व पाहणे. पावसात भिजण्याचा हट्ट, चिमुकल्या हातांनी आई-वडिलांचा हात धरून चालण्याचा विश्वास आणि प्रत्येक क्षणी "हे काय?", "का?", "कसं?" असे प्रश्न विचारत जगाला समजून घेण्याचा निरागस प्रयत्न.या वयात मुलांना संपत्तीची गरज नसते, महागड्या वस्तूंची अपेक्षा नसते. त्यांना हवी असते ती फक्त आई-वडिलांची साथ, त्यांच्या चेहऱ्यावरचे प्रेमळ हास्य, त्यांच्या मिठीतील सुरक्षितता आणि त्यांच्या सहवासातील काही अमूल्य क्षण.परंतु दुर्दैवाने आज आपण आपल्या मुलांसाठी सर्व काही विकत घेतो; पण स्वतःचा वेळ मात्र देऊ शकत नाही. घरात सर्वजण एकत्र असतात, पण प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो. मुलं काही सांगायला येतात, काही दाखवायला येतात, एखादा प्रश्न विचारतात; पण आपण "थांब जरा...", "आता नको...", "नंतर बोलू..." एवढेच उत्तर देतो. नकळत आपण त्यांच्या बालपणाचे दरवाजे स्वतःच बंद करत असतो.लक्षात ठेवा, मुलांच्या प्रत्येक प्रश्नामागे ज्ञानाची भूक असते. त्यांच्या प्रत्येक बडबडीत प्रेमाची अपेक्षा असते. त्यांच्या प्रत्येक हट्टामागे तुमच्यासोबत काही क्षण जगण्याची इच्छा असते.म्हणून ते तुमच्याशी बोलत असतील तर त्यांना ऐका. ते खेळायला बोलावत असतील तर त्यांच्यासोबत खेळा. त्यांनी काढलेले वाकडे-तिकडे चित्रही एखाद्या महान कलाकृतीसारखे कौतुकाने पाहा. तुमचे मूल तुमच्याकडे आले की मोबाईल बाजूला ठेवा. त्याच्या डोळ्यांत डोळे घालून बोला. त्याला मिठी मारा. त्याच्यासोबत हसा, खेळा, धावा, गोष्टी सांगा आणि त्याचे प्रत्येक क्षण मनापासून जगा. कारण त्या छोट्याशा क्षणांत त्यांचे संपूर्ण विश्व सामावलेले असते.एक दिवस हेच मुल मोठे होईल. त्याच्या आयुष्यात जबाबदाऱ्या येतील, त्याचे जग बदलेल, मग तुम्ही पुन्हा त्याला लहान मुलासारखे कुशीत घेऊ शकणार नाही, त्याचे निरागस प्रश्न ऐकू येणार नाही. आणि तुमच्या मांडीवर बसून गप्पा मारणारे ते लहानसे मूल फक्त आठवणीत उरेल. तेव्हा मनात एकच खंत राहिल की "त्यावेळी थोडा अधिक वेळ आपल्या मुलासाठी दिला असता तर."लक्षात ठेवा...पैसा पुन्हा कमावता येतो...यश पुन्हा मिळवता येते...हरवलेल्या वस्तू पुन्हा सापडू शकतात...पण एकदा निघून गेलेले बालपण कोणत्याही किंमतीत परत मिळत नाही.मुलांना महागड्या भेटवस्तूंपेक्षा तुमचा वेळ द्या. कारण भविष्यात त्यांना तुमच्याकडून मिळालेली खेळणी आठवणार नाहीत; पण तुमच्यासोबत खेळलेले क्षण आयुष्यभर त्यांच्या मनात जिवंत राहतील.बालपण हा आयुष्याचा केवळ एक टप्पा नसतो; तो आयुष्यभर मनाला सुखावणारी, डोळ्यांत पाणी आणणारी आणि हृदयात कायमची जपली जाणारी एक अमूल्य आठवण असते.चला... आपल्या मुलांचे बालपण जपूया. आज तुमचे मूल तुम्हाला काही सांगायला आले, तुमचा हात धरून खेळायला बोलवत असेल किंवा फक्त तुमच्या सहवासाची अपेक्षा करत असेल, तर कृपया तुमचा मोबाईल काही वेळ बाजूला ठेवा. त्याच्याकडे प्रेमाने पहा, त्याचे ऐका, त्याच्याशी संवाद साधा आणि त्याचे बालपण मनापासून जगा.कारण आजचा हा क्षण उद्या फक्त आठवण बनून राहणार आहे.........

**प्रा. डॉ. संतोष डाखरे,**
**राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली**
**मो. ८२७५२९१५९६**

# मैत्री, मित्रत्व निभावणाऱ्या सर्व मित्रांना मैत्री दिनाच्या मैत्रीपूर्ण मनःपूर्वक शुभेच्छा

' नातं ' या परिघातलं सगळ्यात सुंदर, सगळयात उत्तुंग आणि सगळ्यात सर्वोत्तम नातं जर कोणतं असेल तर ते म्हणजे मैत्रीचं नातं...जात, धर्म, पंथ, पक्ष, परंपरा, रक्त, मास, पेशी या सगळ्यांच्या पलीकडे असणारं आणि ज्याला चिरतरुण असं आयुष्य लाभलं आहे ते नातं म्हणजेच मैत्रीचं नातं...किती अलौकिक अशी गोष्ट आहे ना खरंच माणसाच्या आयुष्याची...कशी??ते सांगतो...आपण जन्मण्याच्या पूर्वी आपल्याला काहीही माहित नसतं आपण कुठल्या आईच्या कुशीत, कुठल्या बापाच्या मुशीत, कुठल्या धर्मात, कुठल्या जातीत आणि कुठल्या कुळात जन्मणार आहोत ते.... आपण खूप गरीब घरात जन्माला येणारं आहोत की खूप श्रीमंत घरात जन्माला येणारं आहोत...काहीच काहीच माहिती नसतं...काळ, वेळ, स्थळ, दिनांक,वार, महिना आणि वर्ष असं काहीही माहिती नसतं...एक भ्रूण, अर्भक, शिशु यापासून ते एक बाळ इथपर्यंतचा आपला प्रवास हा फक्त आपल्या जन्म देणाऱ्या आईला माहिती असतो...आणि आपला जन्म झाल्यावर मग आपल्याला आपण कोण आहोत, कुठं आहोत, कुठल्या जातीत आहोत, कुठल्या धर्मात आहोत हे कळायला लागतं...मग हळूहळू आपण आपल्या मर्यादा, सीमारेषा, परीघ हे निर्धारित करत जातो...जसं जसं वय, उंची, वेळ वाढत जातो तसं तसं आपल्या जाणीवा, आपल्या नेणिवा या तीव्र होतं जातात...मग अपल्याला नातीगोती कळायला लागतात, शेजारी पाजारी कळायला लागतात, आपलं कोण आणि परकं कोण हेही कळायला लागतं...आणि मग खूप खूप शिकतो, मोठे होतो आणि आपण मग आपला कचरा शोधत असतो...आपली जात, आपली पोटजात, आपला धर्म, आपलं कुळ, आपली श्रीमंती, आपली गरिबी अशा कचऱ्यांनी आपली मनाची घंटागाडी गच्च भरतो...हा कचरा आयुष्यभर आपण तर सांभाळून जगतोच पण येणाऱ्या सगळ्या पिढ्यांना आपण याच कचऱ्याचं संगोपन करायला लावतो...पण मित्रहो या कचऱ्याच्या विरोधात, या कचऱ्याच्या पलीकडे, या कचऱ्याला ओलांडून, याला लाथाडून जर पुढ काय जात असेल तर ती म्हणजे निखळ, निर्मळ आणि निस्वार्थी मैत्री आणि त्यातून होणारं प्रेम आणि त्यातूनच निर्माण होणाऱ्या आयुष्याच्या जोड्या...या जोड्या म्हणजे केवळ प्रियकर आणि प्रेयसी च्याच जोड्या नव्हे तर जिवलग मित्रांच्या जोड्या, जिवलग मैत्रिणीच्या जोड्या, जिवलग मित्र मैत्रिणींच्या जोड्या...म्हणून मला जगातलं सर्वांग सुंदर नातं कोणतं वाटत असेल तर ते म्हणजे मैत्रीचं...मित्रहो आईवडिलासाठी वृद्धाश्रमं निघाली, नवरा बायकांसाठी आश्रमं निघाली, लेकरांसाठी वसतिगृह निघाली, वृद्धांसाठी आश्रमं निघाली कारण या सगळ्या नात्यात स्वाभिमान, अभिमान, गर्व, अहंकार, श्रेष्ठ, कनिष्ठ, तुझं, माझं, सत्ता, संपत्ती, सखी असे अनेक वाद आहेत म्हणून या सगळ्या नात्यांना विभक्त होण्याचे, परके होण्याचे धोके खूप आहेत...पण मित्रांसाठी अशी कोणतीच रचना निसर्गाने, निर्मिकाने आणि मानवाने निर्माण केली नाही...अनाहुतपणे भेटी होतात, नकळत भेटी होतात, कोण कुणाला कधी कुठे भेटेल याचा काहीही मागमूस नसतो, थांगपत्ता नसतो..पण सहज झालेल्या नकळत झालेल्या या भेटी घट्ट मैत्रीपर्यंत कशा जातात हे कळतंही नाही... ही मैत्रिची नाती का विभक्त होतं नाहीत, का दूर जात नाहीत, का एकमेकांना विसरत नाहीत.. तर याचं कारण हेच आहे की, या नात्यात स्वतःसाठी जगणं माहिती नसतं, स्वतःसाठी सुख घेणं माहिती नसतं, स्वतःसाठी हास्य घेणं माहिती नसतं... माहिती असतं ते केवळ आणि केवळ निखळ आणि निर्मळ समर्पण देणं, अमर्याद प्रेम देणं, मित्र म्हणून, मैत्रीण म्हणून आणि मित्रत्व म्हणून परिपूर्ण न्याय देणं...आणि म्हणून जगाच्या पाठीवर सर्वोत्तम आणि सर्वमान्य काय असेल तर ती म्हणजेच मैत्री....ज्या मैत्रीत अमर्याद विश्वास, अपार प्रेम, अतुलनीय असा आदर आणि आरपार असणारी पारदर्शकता आहे ती मैत्री ही कायम चिरायू होत असते...प्रत्येकाच्या आयुष्यात असा एक एकतरी मित्र किंवा अशी एकतरी मैत्रीण असतेच जी या नात्याला चिराय करते...कायम नवं नवं करत जाते...माझ्या आयुष्यात असणाऱ्या अशा सर्व जिंदादिल, माझं कायम कुशल मंगल चिंतनाऱ्या, माझ्या सुख दुःखात सदैव उपस्थित असणाऱ्या आणि प्राणप्रिय मित्र आणि मैत्रिणींना मैत्री दिनाच्या श्वासाँकीत कोटी कोटी शुभेच्छा.आपला मित्र, सखा, सोबती

**प्रा. शिंदे पंकज भास्करराव**
**औरंगाबाद**
**मो. ९५२९२७७२२९**

# लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना श्रमजीवी मध्ये अभिवादन




**मुरुम (प्रतिनिधी) :** श्रमजीवी अध्यापक महाविद्यालय उमरगा येथे लोकमान्य टिळक यांच्या स्मृतीदिनानिमित्त व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सरपे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र शासनाने निर्देशीत केल्याप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त या वर्षापासून विद्यार्थी मध्ये लेखानाचे महत्व व्रद्धिंगत व्हावे व लेखन कौशल्य वाढावे या साठी लेखन प्रेरणा दिन महाविद्यालय मध्ये साजरा करण्यात आला या प्रसंगी प्रा.डॉ. कदम प्रवीणकुमार, प्रा. चव्हाण देविदास,प्रा. पवार भाऊ, प्रा. तेजस्विनी करंडे, प्रा. इंगळे अमोल, मोरे विजय, दुर्गे माधव,आदित्य सूर्यवंशी,सुरवसे दगडू व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ ऑगस्ट २०२६


## पालक-शिक्षकांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधा : मान्यवरांचे प्रतिपादन




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्यातील संस्कार, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी पालक व शिक्षक यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. घर आणि शाळा यांनी एकत्रितपणे कार्य केल्यासच विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडू शकते, असे प्रतिपादन मान्यवरांनी पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, केसरजवळगा येथे आयोजित पालक मेळाव्यात केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष अजीज शेख, माजी सरपंच अमोल पटवारी, उपसरपंच जयंपालसिंग राजपूत, विजय गायकवाड, शेखर चिंचोरे, बालाजी डिगोळे, डॉ. जीरोळे, राजू परीट (मामा), शमशोद्दीन इनामदार, रमा सुरवसे, लक्ष्मी राजपूत, इंद्रजित लोखंडे, गुंडा महाराज तसेच इसुनाथ घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी ए.टी.एस. परीक्षेत यश मिळविलेल्या शशांक शरणप्पा चिंचोरे, शशिकला शरणप्पा चिंचोरे आणि वेदांत प्रशांत चिंचोरे या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेले प्रथम हणमंत जीरोळे व स्वराली विजयसिंह राजपूत, तसेच इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या सानवी इंद्रजित लोखंडे (१९८ गुण), सायली महेश कांबळे (१९२ गुण), श्रीकांत अमृत हल्ले (१७६ गुण), दीपिका ख्यामलिंग घोडके (१७४ गुण), रिया नागेश सोनकांबळे (१४८ गुण) आणि निरंजन राजेंद्र तोरणगे (१३० गुण) या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला.याच कार्यक्रमात शाळेत नव्याने बदलीने रुजू झालेल्या श्रीम. सुनीता शंकर चव्हाण, श्री. विनोद तुळशीराम सूर्यवंशी, श्री. राजेश सुरेश सूर्यवंशी, श्री. प्रदीप बिभिषण सागरे, श्री. बालाजी रामसिंग चव्हाण, कु. पूजा मनोज जाधव आणि कु. निकिता कल्याणी रायभोगे या शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. नव्या शिक्षकांमुळे शाळेच्या शैक्षणिक वाटचालीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.कार्यक्रमात पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत शिक्षकांशी संवाद साधला. शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली तसेच गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामागील पालकांच्या योगदानाचाही गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे आकर्षक चित्रांकन चित्रकार अर्जुन दत्तात्रय पांढरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सुनिल राठोड यांनी केले, तर बालाजी भोसले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक संजीव भोसले, सुनिल राठोड, सहदेव बोडरे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, मान्यवरांची उपस्थिती आणि गुणवंत विद्यार्थी व नवागत शिक्षकांच्या सत्कारामुळे कार्यक्रम प्रेरणादायी व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## शब्द

शब्द आकार .
शब्द विकार.
शब्द परोपकार .
शब्द अंहकार.

शब्द असते भान .
शब्द वाढविती शान.
शब्द ठरतात बाण .
शब्द उठविती रान .

शब्द असतो विश्वास.
शब्द करतो नास.
शब्द एक फास्
शब्द बकवास .

शब्द जोडतात नाती.
शब्द तोडतात जाती.
शब्द गोडवा गाती.
शब्द करती माती.

शब्द कर्म.
शब्द मर्म,
शब्द सामर्थ,
शब्द परमार्थ.

शब्द करती मंगल.
शब्द घडविति दंगल .
शब्द जपती ,मानवी मूल्य.
शब्द ठरतो कवडी तुल्य.

**मधुबानंदा प्रधान**
**कपिलवस्तूनगर**
**अकोला.**
**मो.** 942171991


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क
9405109103


## राज्यात पावसाचा हाहाकार; अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती



**मुंबई :** राज्यातील बहुतांश जिल्ह्याला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. परिणामी नदीनाल्यासह धरणांच्या जलसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. अशातच उजनी धरणात देखील मोठ्याप्रमाणत पाण्याची पातळी वाढली आहे. परिणामी उजनी धरणातून सोडण्यात येत असलेल्या पाण्यामुळे पंढरपूर शहरात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. तर तिकडे भीमा नदीने देखील इशारा पातळी ओलांडून धोक्याच्या पातळीकडे वाटचाल सुरू केली आहे. अशातच नदीकाठी असणाऱ्या व्यास नारायण वसाहतीमध्ये पाणी शिरल्याचे चित्र असून स्थानिक प्रशासन, पोलिस आणि नगरसेवकांनी रात्री उशिरा या भागातील नागरिकांचे स्थलांतर केले आहे.


उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे पंढरपूरमधील भीमा (चंद्रभागा) नदीने 443 मीटरची इशारा पातळी ओलांडून धोक्याच्या पातळीकडे वाटचाल सुरू केली असून, सध्या नदीपात्रात 1 लाख 6 हजार क्युसेक इतका विसर्ग सुरू असल्याने पाणी वाळवंट आणि घाटावरून थेट रस्त्यावर येऊ लागले आहे. मात्र, यात एक दिलासादायक बाब म्हणजे उजनी धरणातून होणारा 90 हजारांचा विसर्ग आता कमी करून 75 हजारांवर आणण्यात आला असून, येत्या दोन दिवसांत पुणे आणि सातारा परिसरात पाऊस न पडल्यास पूरस्थितीचा सामना करणाऱ्या पंढरपूरला मोठा दिलासा मिळू शकेल. साताऱ्यात कृष्णा नदीने पुन्हा रौद्ररूप धारण केले असून, लिंब-गोवे परिसरातील ऐतिहासिक कोटेश्वर महादेव मंदिराला पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे. नदीचा प्रवाह दुतर्फा झाल्याने मंदिराकडे जाणारा मार्ग, त्याजवळील जुना पूल, लिंबचा पुरातन घाट आणि मर्ढे-आनेवाडी दरम्यानचा पूल पाण्याखाली गेल्याने भाविकांना दर्शनासाठी जाणे अशक्य झाले आहे. एकीकडे धोम-बलकवडी धरणे पूर्ण क्षमतेने भरल्याने त्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे, तर दुसरीकडे पावसाचा जोरही कायम असल्याने कृष्णेच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असून नदीकाठच्या परिसरामध्ये पुन्हा एकदा पूरस्थितीचे गंभीर सावट निर्माण झाले आहे.

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ ऑगस्ट २०२६

# निसर्ग सूक्त - मनमुक्त व्यक्त करणारी अभंग कविता




ख्यातनाम कवी साक्षेपी ललितलेखक विजय शं माळी याचा निसर्ग सूक्त हा कवितासंग्रह म्हणजे आत्मिक स्वानंद शोधाची मुक्त व्यक्त मर्मबंधातली ठेव आहे.या आपल्या निसर्गाकडे प्रपंच मायाळू स्नेहाळू भावनेतूनपहा. आणि चिंतन करा आपणास निसर्गाने सदोदित ओंजळ भरुनच दिले आहे.म्हणून या निसर्गरम्य अनुभूतीची निस्सीम भक्ती करत ही कविता निसर्गाचे सूक्त गाणारी आहे.निसर्ग आहे म्हणून आपण खरे सुरक्षित समृद्ध आहोत.ही कविता इतकी हृदय स्पर्शी व समृद्ध कविता आहे.अतिशय उत्तम आशय संपन्न सृजन समर्पक तरल निसर्गभाव व माणूस यांच्या ऋणानुबंधाचे भाव या कवितेत आहे.हे निसर्ग सूक्त झाडांचे अनंत उपकार देऊन आहेत.ती माणसासारखी कृतघ्न नाहीत.कवी या निसर्गरम्य मातृत्व अनुभूतीतून समग्र एकाग्र होऊन आपली निस्सीम सृजनशील स्नेहाळू भावनेचा निचरा आपल्या शब्दभांडाराने कवी विजय शं माळी व्यक्त करतात.निसर्ग सूक्त ही कविता म्हणजे एक अंखड अभंग साधना आहे.ती खंडीत नाहीच तितकीच भंग न पावनारी आहे.म्हणून कवीने आपल्या अंतरंगाचे सारं सर्वस्व अर्पण करून हे सूक्त मुक्त व्यक्त केले आहे.ते असे"तुझं येणं: वैशाखातली छाया,घनगर्द आभाळ माया"तूझं येणं: चैत्रपालवीचा बहर, शब्दाचा मोहर... अंगभर"(पृ.9)या समकालीन वास्तवाची प्रखर सविनय नोंद या कवितेने घेतली आहे. 'तूझं येणं ते पाखरा'अशा प्रचंड स्नेहाळू ओढीच्या कविता आहेत.सांजमुद्रा,मटकीच्या कंच जाळीत रेंगाळती सोनपिवळी उन्हं,पाखरांचे स्वच्छंद थवे..एक सृजनशील तत्कालीन निसर्ग सूक्त मनमोहून जाणारं चित्रण इथं येते.झाडं हे तर या सृष्टीतील जीवाला अमाप शिदोरी देऊन जाते.मग कवी माणूस आणि झाडांची तुलना प्रतिमेच्या माध्यमातून करतात.'झाडं विकतं नाही इमान, कृतघ्न कुऱ्हाडी, झाडं प्रदूषण रोखतात,'क्लोरिन' वा 'सायनाईड'ची झुळूक,हा झाडांचा शितळ वारसा,पिठूर चांदणझडीत, झाडं उच्च- नीच भेदभाव करत नाहीत.हीमाणुसकी शिकवणारी निसर्ग सूक्ताची कविता तरीही लोकं माणसाच्या अंगांत झाडा अणून झाडाला बदनाम करतात.निसर्ग सूक्त ही संपूर्ण कविता कवीच्या चिंतन सृष्टीचा शिवार माथा आहे.झाकोळ,आभाळ, आणि पागोळ्या यातील आभाळाचे रंग, रानं शिवारावरचा झाकोळ आणि मन मुक्त पाऊस पागोळ्या म्हणजे ही एक निसर्ग सूक्ताची जणू अभिव्यक्ती आहे.जसे "मान टाकल्या दीठी दिठीतून बहराचे घोस माळून/कभिन्न मेघाकडांतून झरत्या कंचनी पोतासारखी/मागं सारल्या संभारातून प्राजक्त सांडत/रोमारोमात चैतन्य पेरंत/(पृ.28)ही कविता म्हणजे घनघोर आभाळाची छाया व माया आहे.हे मनस्वी सूक्त आहे.सांजसावळे ऊन उतरले..हे निर्सगसूक्त म्हणजे काव्यमय एक शब्द फुलपाखरू होऊन आपल्या अप्रतिम शब्दसंपदेने काव्य तरलता देऊन जाते.अनुपम भाषा सौंदर्य काव्याची मौलिक शब्दकळा, प्रगल्भ चिंतनाच्या मुशीतून आलेलं मनभावन जीवनदर्शन, मनावर गारूड करणारी चित्रदर्शी, सहज सुंदर शैली गंधभार प्राजक्तफुल टपटपत राहावीत जशी प्रतिमा-प्रतिकांनी मोहविणाऱ्या, आभाळ मातीचं नातं व्यक्त करणाऱ्या, त्याचे पदर हळूवार उलगडत जाणाऱ्या, रसिक मनमुग्ध चिंब भिजवणाऱ्या या कविता आहेत" (मलपृष्ठ) ही कविता हिरव्या गर्द रानाचे जसे बोल देऊन जाते तशी विलोभनीय काही मानवी दृश्य ही देऊन जाते.'सांजसावळे उन्हं उतरले','आता इथं कुणीच राहात नाही' तू,मी आणि पाऊस: काही कविता.हा मानवी प्रेम भावबंधाचा एक अनुबंध आहे.अंगावर मोर पिस फिरावं बरसाव्यात अमृतधारा पावसाच्या,मन निसर्गाकडे सतत धावत राहते, तेव्हा हाॅस्पिटल वार्ड मधून एक निस्सीम प्रेम भक्तीने ही ओढ लाघवी आहे.तर 'निळ्या आभाळी टिपूर..ही कविता अशी."दुर नदीच्या पल्याड वनी घुमते विराणी.वेळू बनात उदास कुणी मांडियली गाणी.रुप न्याहळता जळी केव्हा ओणवले माड शांत जळात हिंदोळे मंद चांदण्याचे झाड"..(पृ.39)ही कनवाळू झिरपत जाणारी निसर्ग सूक्त ओल मन ओथंबून येणारी असल्याने ही कविता खोलवर नितळ निर्लेप निस्पृह झरा करून जाते.'चादण्याच्या कविता नवा सूर्योदय,ही कविता तर आजच्या वर्तमानाची अस्वस्थ वेदनीची सल उजागर करते"उपाशी पोटी.. निष्प्राण..जगाचा पोशिंदा, पिढ्यानपिढ्याच्या अंधाराला मुर्दाड व्यवस्थेला शरण..(पृ.50)हा अतिशय चिंतनाचा विषय आशय आहे.पण कवी आपल्या सृजनशील भावनेचा ओलावा निसर्ग सूक्त ओलावा 'शाल चंदेरी ओढून,तूझा आठव आठव,गाली गुलाब उषेच्या, निळ्या सावळ्या मेघामधूनी या कवितेच्या अंतरंगात अत्यंत देखणा एक निर्झर आहे.हे देखणं रूप मनाला मोहून टाकते.काट्याच्या कविता ही धारधार निर्धाराची कविता आहे.यातील कृतघ्न भाव,जखमांचे घायाळपण, मनाचा स्मृतिविभोर अशी ही कविता आहे तर'निळ्या सावळ्या मेघामधूनी ते लिहितात कृतज्ञता व्यक्त करतात जसे"श्यामल गहिऱ्या मेघकडांतून अविरत जयंती सोनसडे.साद घालती चिंब नहाते हिरवे हिरवे गर्द कडे"(पृ.55)हानिसर्गाच्या सान्निध्यातील मुक्त मनस्वी आविष्कार आहे.'मौन उभे झाड झाड,वान खोटा कस्तुरीचा,चिंब अमृतात न्हाले,लय घुंगुराची कानी, आल्या आल्या मेघमाला,या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे हे निसर्ग सूक्त आहे.'रानात हरवली वाट'ही नाधों ची सय येते.इतकं तरलं सजग भान हरपून ही कविता आली आहे जसे"रानात हरवली वाट जीव सैराट कापरे तनी.पानात गूज कानात रानारानाच्या भेद ये मनी"(पृ.68)हारानशिवार रानवाटा मनाला भन्नाट करून जातात इतकी मायमातीची मुठभर ललाट माखून हे निसर्ग सूक्त एक सृजनशील कृतार्थ भावनेतून सार्थक शब्दांच्या झुंबर कोंदणात ही कविता वेल्हाळ पाखरू होऊन झाडं फांदीवर झुलतांना दिसते आहे.या अभंग भावनेतून हे प्रेषित पुरूषोत्तमा.म्हणतं हा निसर्ग सूक्ताचा दरवळ देताना'झरझर पाऊस आला ग,धारात पारवा न्हाला गss.असं म्हणतं ही कविता पाखरांच्या पंखात नाद देऊन जाते.जसेपान पान लागे गळू.."धीरगंभीर डोहाची लागे व्यथा भळभळू.जाळी जाळी अनावर पान पान लागे गळू"(पृ.78)ही कवीच्या चिंतन सृष्टीची अमोघ स्वानंद भावना आहे.माणूस हा या निसर्गरम्य सृष्टीची आत्मानुभूती घेत जगत राहिला तर खरंच जल जंगल जमीन हीच खरी संपत्ती आहे.या कवितेने निस्सीम निसर्ग सूक्त व्यक्त केले आहे.नद्या,डोंगर,झाडे वेली पाने फुले फळे ही सृजनाची सुखद स्वानंद देणारे भाव आहेत.कवी विजय शं माळी यांनी ही माय मातीच्या नात्याची नाळ काव्यमय शब्द गुंफून सत्यशोधक आनंद दिला आहे.'मनोगत,चांदवा, मनमोहन टाकतो आहे.तर "फांदीला नील नभाच्या जलदाचे फुलले झेले.या तृषित धरा ताराया घन श्यामल दाटून आले "(पृ.119)ही निसर्ग सूक्तांच्या ओळी मनाला एक अनामिक छंद ओढ देऊन जातात.तर 'पाखराssही आर्त साद मनाचीमिनार उभी करते.मनाच्या फांदीवर ये अन् मूक्त व्यक्त हो रे पाखरा.अंतिम सत्य प्रचंड जीवघेणे आहे.या समकालीन वास्तवाचे भान असे की,या निसर्गाचे संवर्धन व संरक्षण कुणीच करत नाही.पाखरांनी कुठं जावं कुठं राहवं कसं जगावं.?झाडं नदी पाणी याचा थांगपत्ता राहिला नाही.म्हणून 'काळजाचे स्टडस् नि 'बाॅम्ब्ज्',घट्ट तेलाच्या कुट्ट लाटा, सैरभैर भांबवलेला समुद्रपक्षी, आम्ही निसर्गाचेच माणूस आहोत का?की आमच्याच यंत्राचे गुलाम.या सृष्टीचा विनाष्काल झालाय.सारा आसमंत धुरांने माखून गेलाय पक्ष्यांचे थवे जीव गुदमरून मृत्यू होताहेत.ही सखेद वेदनेची खंत शेवटच्या चरणात कवी देऊन जातात.मी कशी निसर्ग सूक्त गाऊ म्हणून ती कविता अशी "उऽठपाखराऽनको असं नुसतंच पाहू बिटीबिटी.इथल्या काळजांचेच झालेत आता 'स्कडस् नि 'बाॅम्बज्'..(पृ.122)हे भयांकित वास्तव या निसर्गाच्या सान्निध्यात घडते आहे.म्हणून व्यक्त-अव्यक्ताच्या रुपांमधील कृत्रिमता मग आपसूकच गळून पडते.नि प्रेमाला, व्यक्त अव्यक्ताला,आभाळ-अवकाशाची व्याप्ती प्राप्त होते.रसिकांना स्वतः बरोबर खेचण्याचं विलक्षण सामर्थ्य असलेली ही चिंतनगर्भ, प्रगल्भ कविता म्हणूनचं वाचक मनात दीर्घकाळ रेंगाळत राहते".(मलपृष्ठ)अशी ही निस्सीम नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून निसर्ग सूक्त व्यक्त झालेले आहेत.हेच काव्य सामर्थ्य या कवितेचे श्रेयस आहेगौरीश सोनार यांचे आशय संपन्न सृजन समर्पक मुखपृष्ठ आहे.जेष्ठ कवी विजय शं माळी सरांना मनस्वी शुभेच्छा.

**पुस्तक:-निसर्ग सूक्त**
**(कवितासंग्रह)कवी:-विजय शं माळी**
**प्रकाशक:-विजयि वितरण कऱ्हाड**
**सातारा मुखपृष्ठ:-गौरीश सोनार**
**रेखाटने:-विद्या म्हैसकर, संदेश लोहार**
**मूल्य:-250/रूपये पुस्तक परिचय**



**परिक्षण:- डॉ प्रभाकर शेळके जालना**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ ऑगस्ट २०२६

# पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन




अलीकडेच, वाराणसीतील इयत्ता 12 वीच्या विद्यार्थ्यांच्या एका गटाशी संवाद साधताना, एका हुशार तरुणीने मला एक प्रश्न विचारला. सर, तुम्हाला काय वाटतं? देशाच्या राजधानीत जे चाललंय त्याबद्दल? हजारो तरुण विद्यार्थी आपली भीती घालवून पोलिसांच्या क्रूरपणाचा (ब्रुटॅलिटीचा) सामना करत आहेत आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (NTA) वैधतेबद्दल, किंवा सरकार आणि संबंधित मंत्र्यांच्या बाजूने अगदी किमान नैतिक उत्तरदायित्वाच्या अभावाबद्दल आपल्या चिंता व्यक्त करत आहेत?" पेपर फुटीच्या पुनरावृत्तीने NEET सारख्या प्रमाणित चाचणीचा (स्टँडर्डाइज्ड टेस्टचा) मूळ अर्थच क्षुद्र/किरकोळ बनवला आहे, असे तिने ठामपणे सांगितले होते. तिच्या या टोकदार प्रश्नाने, मला आनंद झाला. मी हे नक्कीच सांगितले पाहिजे. शेवटी, केवळ तिच्या स्वत:च्या करिअरच्या विचाराने पछाडलेली एक एकाकी, अलिप्त 'एग्झाम वॉरियर' (परीक्षा योद्धा) म्हणून राहण्याऐवजी, तिला तिच्या स्वत:च्या नशिबात आणि मोठ्या सार्वजनिक मुद्द्यात एक दुवा दिसू शकत होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, समाजशास्त्रज्ञ सी. राइट मिल्स यांनी म्हटल्याप्रमाणे, ती तिचे चरित्र/आत्मचरित्र इतिहासाशी जोडू शकत होती. तिच्याशी आणि तिच्या मित्रांशी संवाद साधण्याच्या प्रक्रियेत, मी लोकशाहीची स्थिती, लोकांची आंदोलने किंवा निषेधाची संस्कृती आणि प्रचलित शिक्षण व्यवस्थेचे संकट यांच्याशी संबंधित तीन समर्पक मुद्द्यांवर विचार करू लागलो. प्रथम, जेव्हा तरुण विद्यार्थी नवी दिल्लीतील जंतरमंतरवर जमा झाले आणि कथितपणे भारतीय लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेच्या दिशेने मार्च करू लागले, तेव्हा त्यातून एक मजबूत संदेश गेला. जर सरकारने सहानुभूतीने ऐकण्याची कला गमावली, आणि ते सत्तेच्या अहंकाराने धुंद राहिले, तर शेवटी ते आपली वैधता गमावते. सरकार, त्याच्या जबरदस्तीच्या यंत्रणेच्या सामर्थ्यामुळे, सर्वव्यापी प्रचाराच्या यंत्रणेमुळे किंवा सर्वोच्च नेत्यामध्ये असलेल्या 'करिश्मा'च्या जादूमुळे, आपण नेहमीच मौनाची संस्कृती लादण्यात आणि लोकांकडून बिनशर्त निष्ठा मिळवण्यात यशस्वी होऊ शकतो अशा भ्रमात राहण्याचा मोह बाळगू शकते. जरी तुम्ही निवडणुका जिंकणे सुरू ठेवले, हिंदू विरुद्ध मुस्लिम या द्वैताच्या व्यसनाधीन औषधाद्वारे लोकांच्या मोठ्या घटकाला संमोहित केले, किंवा मॅकियाव्हेलियन रणनीतींच्या विविध प्रकारांद्वारे विरोधी पक्षांना क्षीण केले, तरीही असे क्षण येतात जेव्हा सामान्य, अनोळखी लोक — समजा, गोंधळलेले आणि चक्रावलेले तरुण विद्यार्थी आणि त्यांचे पालक — मौनाच्या या संस्कृतीवर मात करतात, आपला आवाज उठवतात आणि सरकारला कठीण प्रश्न विचारण्याचे धैर्य प्राप्त करतात. हे आंदोलनही शेवटी आपला वेग गमावेल आणि पुन्हा सर्व काही पूर्ववत होईल की नाही याबद्दल मला खात्री नाही. तथापि, माझा ठाम विश्वास आहे की, या आंदोलनातून सत्ताधारी राजवटीला शिकण्यासारखा कोणता धडा असेल, तर तो नेमका हाच आहे. सत्तेचा अहंकार हेच अनेक सरकारांच्या पतनाचे मुख्य कारण असते; आणि म्हणूनच, सर्वात शक्तिशाली मंत्र्यांनीही नम्रतेचा धडा किंवा जाणीवपूर्वक ऐकण्याची कला शिकली आणि लोकांची "मन की बात" समजून घेण्याचा प्रयत्न केला तर ते फार चांगले होईल. दुसरे, हे आंदोलन असा संदेश देते की, जो सत्ताधारी राजवटीने तसेच आपल्यासारख्या सामान्य नागरिकांनी आत्मसात केला पाहिजे. लोकशाहीला टिकवून ठेवते ती म्हणजे प्रतिकार आणि निषेधाची संस्कृती. हे वेदनादायक आहे की, महात्मा गांधी, भगतसिंग, बी.आर. आंबेडकर आणि जयप्रकाश नारायण यांच्यासारखे महान सर्जनशील विरोधक पाहणाऱ्या समाजात, सत्ताधारी राजवटीच्या वैचारिक यंत्रणेने असे वातावरण निर्माण केले आहे की, ज्यात प्रतिकार किंवा असंतोषाच्या प्रत्येक रूपाची निंदा केली जाते किंवा त्याला 'अर्बन नक्षल' च्या टोळीने सुरू केलेले 'राष्ट्रविरोधी' किंवा 'पाकिस्तान समर्थक' प्रयत्न म्हणून पाहिले जाते. लोक निष्क्रिय आणि गप्प राहिल्यास कोणतेही राष्ट्र राजकीय, सांस्कृतिक आणि नैतिकदृष्ट्या प्रगती करत नाही. लोकशाही टिकवून ठेवते ते बिनशर्त अनुपालन (होय ला होय मिळवणे) नव्हे, तर आपली सर्जनशील शक्ती किंवा चिकित्सक विचार (क्रिटिकल थिंकिंग) होय. जर तुमचे तुमच्या देशावर खरोखरच प्रेम असेल, तर तुम्ही, उदाहरणार्थ, आपले विकासाचे मॉडेल सामाजिक, आर्थिक विषमता कशी निर्माण करत राहते, पर्यावरणाचे प्रचंड नुकसान कसे करते, चांगल्या सार्वजनिक विद्यापीठांचा कसा विनाश करते आणि हुशार (पण आर्थिकदृष्ट्या वंचित) विद्यार्थ्यांना 'पंचतारांकित' खासगी विद्यापीठांमधून शिक्षण घेणे जवळजवळ अशक्य कसे बनवते, याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. जेव्हा या प्रकारच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांची आस्थापना (एस्टॅब्लिशमेंट) 'आंदोलनजीवी' किंवा समस्याप्रधान 'झुरळे' म्हणून टर उडवते, तेव्हा ते दर्शवते की, आपली लोकशाही वेगाने काही प्रकारच्या निवडणुकीच्या हुकूमशाहीसारखी (इलेक्टोरल ऑटोक्रसी) बनत आहे. लोकशाही तिची सर्जनशील चैतन्यशीलता गमावते आणि केवळ नित्यनेमाने येणाऱ्या निवडणुका विधीवत पार पाडण्यापुरती मर्यादित राहते. म्हणूनच, आपण पाहत असलेला निषेध आशेचे किरण निर्माण करतो. तरुण आणि सामान्य लोक मौनाची संस्कृती आणि त्याच्याशी जोडलेल्या भीतीचे मानसशास्त्र यावर मात करत आहेत. एका अर्थाने, हे केवळ राजकारण नाही; ही आशेची शिक्षण पद्धती (पेडागोजी ऑफ होप) आहे. आणि शेवटी, या आंदोलनाला निवडक नेत्यांशी जोडले जाऊ नये (जरी मी सोनम वांगचुक यांच्या समर्पणाचे आणि राहुल गांधी यांच्या चिंतेचे कौतुक करतो); हा देशातील असंख्य तरुणांच्या जागृतीचा क्षण आहे. कदाचित, त्यांना हे जाणवत आहे की धार्मिक ओळख किंवा हायपर-नॅशनलिझमच्या (अति-राष्ट्रवादाच्या) काळजीपूर्वक रचलेल्या चर्चांच्या आधारे लोकांना उत्तेजित करण्याच्या कृतीपेक्षा राजकारणात काहीतरी अधिक आहे. तथापि, मी स्वत:ला विचारत राहतो की, हे तरुण खरोखर समजून घेत आहेत का की, त्यांच्या चिंता संबंधित मंत्र्यांच्या केवळ राजीनाम्याच्या पलीकडे गेल्या पाहिजेत. शेवटी, त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, हा केवळ पेपर फुटीचा मुद्दा नाही;तर तो प्रचलित शिक्षण पद्धती स्वत:च रोगट (पॅथॉलॉजिकल) असण्याबद्दलचा आहे. एका अर्थाने, NEET, JEE आणि CUET सारख्या अत्यंत समस्याप्रधान प्रमाणित चाचण्यांना दिलेल्या एकतर्फी महत्त्वामुळे आपल्या शाळांचे मूल्य कमी झाले आहे आणि त्या जवळजवळ गतप्राण झाल्या आहेत, आणि देशात कोचिंग इंडस्ट्री नावाच्या मोठ्या माफियाचा जन्म झाला आहे. शिवाय, येथे एक बाजार-चलित (मार्केट-ड्रिव्हन) व्यवस्था आहे जी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शास्त्रांमधील निवडक करिअर पर्यायांवर अति भर देते आणि सर्व पर्यायी निवडींचे मूल्य कमी करते, किंवा लिबरल आर्ट्स आणि ह्युमॅनिटीजमध्ये उत्कृष्ट कामगिरी करू इच्छिणाऱ्यांसाठी नोकरीच्या संधी निर्माण करण्यात अपयशी ठरते. अपेक्षितपणेच, NEET आणि JEE सारख्या चाचण्यांनी व्यापक चिंता आणि ताणतणाव निर्माण केला आहे आणि पेपर फुटीच्या पुनरावृत्तीसह सर्व प्रकारच्या गैरप्रकारांसाठी एक पार्श्वभूमी (जमीन) तयार केली आहे. आता GenZ ने अधिक चिकित्सकपणे विचार करण्यास आणि आपली राजकीय-शैक्षणिक क्षितिजे विस्तारण्यास सुरुवात करण्याची वेळ आली आहे.

**लेखक: प्रा. अविजीत पाठक, समाजशास्त्रज्ञ, जेएनयू नवी दिल्ली.**

**भाषांतर: प्रा.प्रियदर्शन भवरे, समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.**

**साभार: द ट्रीब्यून**